जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 23-01-2020
तरूण भारत

# वसुंधरेचे संवर्धन करण्याची गरज

## शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने गेल्या पाच वर्षात ३१ कोटी लिटर क्षमतेचा पाणीसाठा केला असून विद्यापीठ परिसरामध्ये वृक्षारोपन करून जैवविविधतेचे संवर्धन केले आहे. सिमेंटची जंगले वाढत असताना ज्येष्ठ नागरिकांनीसुद्धा वसुंधरा संवर्धनासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्या वतीने 'सांजवात' स्मरणिकेच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गोकुळ दुध संघाचे कार्यकारी संचालक दत्तात्रय घाणेकर होते. यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या मातोश्री नागरबाई शिंदे यांच्यासह अन्य ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवसानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : सांजवात' स्मरणिकेच्या प्रकाशन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत दत्तात्रय घाणेकर, मानसिंग जगताप, शशिकांत दळवी आदी.

डॉ. शिंदे म्हणाले, पर्यावरण संवर्धनासह पाणीसाठा वाढवण्याचा वसा विद्यापीठाने घेतला आहे. याला ज्येष्ठ नागरिकांनी हातभार लावावा. विद्यापीठातील पाणीसाठ्यामुळे सम्राटनगर, प्रतिभानगर परिसरातील बोअरवेलच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. विद्यापीठात येणारे नागरिक उत्स्फूर्तपणे झाडांचे संगोपन करतात. त्यामुळे फिरायला येणाऱ्यांना भरपूर प्रमाणात आक्सिजन मिळतो.

अध्यक्षस्थानी बोलताना घाणेकर म्हणाले, शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी म्हणून गोकुळने दुधासारख्या नाशवंत पदार्थाच्या व्यवसायाचा विकास केला आहे. महिलांनी स्वावलंबी व्हावे यासाठी गोकुळ विशेष प्रयत्न करीत आहे.

ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मानसिंग जगताप यांनी प्रास्ताविक केले. श्रीकांत आडिवरेकर यांनी सुत्रसंचालन केले. सुरेश मिरजकर यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. श्रीधर हेरवाडे, डॉ. आर. व्ही. भोसले, शशिकांत दळवी, यांच्यासह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशस्वी होण्यासाठी स्वतःवर बंधने घाला : डॉ. नांदवडेकर

## कौशल्य, उद्योजकता विकास केंद्रातर्फे कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : ''जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःवर चांगल्या प्रकारची बंधने घालावीत. कार्यालयीन कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी कामाचा आनंद घेणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे विद्यापीठातील कार्यरत हंगामी रोजंदारी लेखनिक, रोजंदारी शिपाई यांच्यासाठी मानव्यशास्त्र सभागृहात एकदिवसीय कार्यशाळा झाली.



डॉ. नांदवडेकर.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठात काम करण्याची संधी मिळाली, याचा प्रत्येकाने अभिमान बाळगला पाहिजे. कार्यालयीन कामे करताना सकारात्मकता बाळगून उत्तम कार्य केले पाहिजे. सहकार्यांची व सहकाराची बांधणी चांगल्या प्रकारे करण्याचे कौशल्य असले पाहिजे. विद्यापीठातील नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. कार्यालयीन वेळेचा सदुपयोग कार्यालयीन कामांसाठीच झाला पाहिजे, यासाठी दक्ष राहिले पाहिजे. कार्यालयीन वेळेत मोबाईलचा वापर टाळून प्रत्येकाने कार्यालयीन शिस्त पाळणे आवश्यक आहे.'

केंद्राचे समन्वयक अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी कार्यालयीन कामांत वेळेचे व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धन उत्कृष्ट कार्याचा उद्या सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यरत असलेल्या इंटरनॅशनल लाँगेव्हिटी सेंटर - इंडिया (आय.एल.सी.-आय.) या संस्थेतर्फे गेले वर्षभर कोल्हापुरात राबविण्यात आलेल्या 'शाश्वत आणि हरित पर्यावरण - ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांचे योगदान २०१९-२०' या कार्यक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थी व महाविद्यालयांचा सत्कार उद्या, शुक्रवारी केला जाणार आहे. सायबर येथील राधाबाई शिंदे स्मृती सभागृहात सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास आय.एल.सी.आय.चे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती निवृत्त कर्नल शशिकांत दळवी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कार्यक्रमास आय.एल.सी.आय.चे चेअरमन जयंत उमराणीकर, कार्यकारी संचालिका अंजली राजे, 'सायबर'चे अध्यक्ष श्रीपतराव शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

पत्रकार परिषदेत राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष व्ही. टी. पाटील, सुशांत सोनवणे, विलास शिंदे, नंदकुमार सकट, आदी उपस्थित होते.

# ‘स्मार्टवर्क’कडे लक्ष दिल्यास यश निश्चित

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

योग्य मार्गदर्शन, प्रेरणा, योग्य संधी साधून विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास साधावा. विद्यार्थ्यांनी ‘हार्डवर्क’ न करता ‘स्मार्टवर्क’कडे अधिक लक्ष दिले पाहिजे. तुम्ही सर्वोत्तम प्रयत्न करा. प्रयत्नाचे फळ निश्चितच मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन आर. डी. पाटील (वडगावकर) होते.




**कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना जी. आर. पळसे. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.**

जी. आर. पळसे म्हणाले, प्रत्येक महाविद्यालयाच्या वर्गातील विद्यार्थी देशाचे भवितव्य समजले जातात. विद्यार्थ्यांचे मन, मेंदू, मनगट यांचा विकास करते ते शिक्षण. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्तगुण ओळखून करिअर निश्चिती करावी. सर्वांगसुंदर जीवन जगायचे असेल, तर आजच्या महाविद्यालयीनविद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रांबाबत सजग असणे गरजेचे आहे.

आर. डी. पाटील वडगावकर म्हणाले, माणूस जन्माला येतो तो कर्तव्याचे ओझे घेऊनच. ते कर्तव्याचे ओझे पेलत असताना त्याच्या जीवनामध्ये संघर्षाचे अनेक प्रसंग येतात.

प्रास्ताविक व अहवाल वाचन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. क्रीडा विभागप्रमुख प्रा. ए. डी. सासने यांनी वर्षभरात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अहवाल वाचन केले. प्रमुख पाहण्यांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे व्हा.चेअरमन डी. जी. किल्लेदार, संचालक ए. जी वणिरे, वाय. एस. चव्हाण, वाय. एल. खाडे, सविता पाटील, पी. सी. पाटील, उदय पाटील, पर्यवेक्षक, एस. एन. इनामदार उपस्थिती होते. आभार ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य टी. के. सरगर यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. एस. एच. शेटके, प्रा. यु. के. गायकवाड प्रा.यु. आर. बिरंजे यांनी केले.